**<u>नियमित दिवाणी दावा क्र.५३/२०११</u>**

गणेश वि. सरस्वतीबाई व ईतर

## <u>निशाणी क्र.९१ खालील आदेश</u>

**(पारित दिनांक ०९/०१/२०२४)**

०१. प्रस्तुतचा अर्ज विनालेखी जबाबाचा आदेश सेटअसाईड होणेकरिता प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी असे कथन आहे की, वादीने दिनांक १४/०७/२०२३ रोजी दुरुस्ती दावा दाखल केलेला आहे, परंतु वादीने सदर दुरुस्ती दाव्यातील दंड/खर्च न्यायालयात वेळेत जमा न केल्यामुळे वादीस सदर दुरुस्ती दावा दाखल करण्यास सुध्दा विलंब झलेला आहे. तसेच प्रतिवादी हे वयोवृध्द असुन ते बाहेरगावी राहत असल्याने त्यांचा आममुख्त्यार यांच्याशी संपर्क होउ शकला नाही. त्यामुळे प्रतिवादी मुदतीत त्यांचा लेखी जबाब दाखल करु शकले नाहीत. प्रतिवादींनी सदरचा विलंब हेतुपुरस्सर किंवा जाणुनबुजून केलेला नसुन झालेला विलंब क्षमापीत करण्याच्या पात्रतेचा असुन प्रतिवादींनी सदर दाव्यात दुरुस्ती दाव्यात लेखी जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन लेखी जबाब दाखल करुन घेण्याची विनंती केली. त्यामुळे प्रतिवादींच्या विरोधात झालेला विनालेखी जबाबाचा आदेश रद्द होवुन त्यांचा लेखी जबाब स्वीकारण्यात यावा, अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

०३. वादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले की, प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादींनी कोणतेच संयुक्तीक कारण नमुद केलेले नाही. तसेच प्रतिवादींना किती विलंब झाला हे देखील नमुद नाही. करीता सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती वादीने केली आहे.

०४. अर्ज व म्हणणे याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी हे वयोवृध्द असुन त्यांचा आममुखत्यार यांच्याशी संपर्क न झाल्याने प्रतिवादी हे वेळेवर हजर होउ शकले नाही व त्यांचा दुरुस्ती दाव्यावर लेखी जबाब व से हा मुदतीत दाखल करु शकले नाहीत. तसेच मूळ दाव्यातील वादविषय पाहता प्रस्तुत दावा हा गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी तसेच गुणदोषावर निकाल होणेकरिता प्रतिवादी यांचा दुरुस्ती दाव्यावर लेखी जबाब पटलावर येणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरील अर्ज मंजूर करणे गरजेचे आहे. सबब, सदरील विलंब माफ होण्यास पात्र आहे, असे माझे मत झाले आहे. करिता, मी पुढीलप्रमाणे आदेश करते.

## आ दे श

१. सदरचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

स्वा/–
(श्रीमती एल.पी. धन्वे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
मंठा.

ठिकाण– मंठा
दिनांक– ०९/१०/२०२४